# हरवलोय

 

बसायचो मी तेथे...
त्या बाकावर प्रतिक्षा करीत तुझी
कधीतरी फिरतील तुझी पाऊलं कमलांच्या आठवणीनं
आठवतं एकदा
मी पाण्यात वाकून तोडलं होतं एक तुझ्यासाठी
ते जपलंस तू दोन दिवस
माझं तू निर्माल्य करेतो...
नंतर मला वेडच लागलं,
त्या बाकावर येऊन बसण्याचं
नकळत तुझी वाट पाहात...
वाटलं होतं,बसशील अलगद् येऊन शेजारी
हसशील खिन्नता लपवीत
जे व्हायचंत ते झालं नाही म्हणून
जे हरवलं त्याच्या आठवणीनं...

पण ती प्रतिक्षा खरी त्याची ठरली,
तो येण्याची...अखेरच्या भेटीला...
आलीस कधी चुकून इथं
मला ह्या बाकावर शोधायला
विचार तू त्या कमळाना
मी कुठंय?
आठवणींच्या पंखांवर
अभ्रांची वल्कलं पांघरली मी अखेरी
हरवलोय आता मी
अंतराळात...